**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, (लोहमार्ग) न्यायालय, दौंड यांचे न्यायालयात.**

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २६० व २६३ प्रमाणे समरी फौजदारी खटल्याचे विवरण

**सं. फौ. ख. क. २२२८/२०१६.**
**निशाणी : .**

१. गुन्हा घडल्याची तारीख : ०३/०८/२०१६.

२. फिर्याद दाखल तारीख : ०३/०८/२०१६.

३. फिर्यादीचे नांव : श्री. शंभूकुमार,
आर.पी.एफ, कुर्डुवाडी.

४. आरोपीचे नांव : शाहरुख युसूफ शेख,
वय १८ वर्षे, रा. कोर्टी,
ता. पंढरपूर, जि. सोलापूर.

५. गुन्हा कलम : कलम १५५ रेल्वे अधिनियम कायदा, १९८९

**अपराधाचे विवरण –**

दिनांक ०३/०८/२०१६ रोजी ६.०० वाजता तुम्ही कुर्डुवाडी रेल्वे स्थानक येथील उच्च श्रेणी प्रतिक्षालयामध्ये अनाधिकृतपणे बसलेले मिळून आलात व त्यानुसार तुम्ही कलम १५५ रेल्वे अधिनियम १९८९ नुसार शिक्षापात्र गुन्हा केलेला आहे.

**– आरोपीचे प्रतिकथन –**

प्र. १ : तुम्हाला दाखल केलेल्या फिर्यादीची नक्कल प्रत मिळाली काय?
उत्तर : होय.

प्र. २ : तुम्हाला वाचून दाखविलेल्या गुन्हयाचा तपशिल समजला आहे काय?
उत्तर : होय.

प्र. ३ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर : नाही, मला गुन्हा कबूल नाही.

आरोपीची सही .......................................

**समक्ष**

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक : ०३/०८/२०१६.**

## फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १

मी शपथपूर्वक कथन करतो ते येणेप्रमाणे :

माझे नांव : श्री. ए. बी. बाबर,

वय : ३५ वर्षे, व्यवसाय : उप निरिक्षक, आर.पी.एफ., कुर्डुवाडी.

राहण्याचे ठिकाण : कुर्डुवाडी.

## फिर्यादी पक्षातर्फे सरतपास सरकारी वकील गैरहजर साक्षीदार स्वत:—

१. दिनांक ०३/०८/२०१६ रोजी फिर्यादी, श्री. शंभूकुमार, आर. पी. एफ. कुर्डुवाडी यांनी फिर्याद दिली की, त्यांची कुर्डुवाडी रेल्वे स्थानकावर होती. त्यावेळेस आरोपी हा ६.०० वाजता उच्च श्रेणी प्रतिक्षालयामध्ये अनाधिकृतरीत्या बसलेले असतांना त्यांना मिळून आला. त्यानंतर फिर्यादीने त्यास पकडून माझेकडे आणले व लेखी फिर्याद दिली. मी फिर्यादीची फिर्याद लिहून घेतली असून त्यावर फिर्यादीची व माझी सही आहे. आता मला ती फिर्याद दाखविली असून ती तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास आता निशाणी ३ देण्यात आले. आरोपी हा उच्च श्रेणी प्रतिक्षालयामध्ये बसलेला असताना मिळून आला म्हणून मी आरोपीविरुद्ध कलम १५५ रेल्वे अधिनियमानुसार फिर्याद दाखल केली. आरोपी आज रोजी उपस्थित आहे. त्यास मी ओळखतो.

## उलटतपास आरोपीतर्फे तो स्वत: :

२. हे म्हणणे खरे नाही की, मी उच्च श्रेणी प्रतिक्षालय येथे बसलेले होतो हे तुम्ही खोटे सांगत आहात. हे म्हणणे खरे नाही की, तुम्ही माझेवर खोटी केस केली आहे.

फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**
**दिनांक : ०३/०८/२०१६**

**<u>फौजदारी प्रकिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपीचा जबाब.</u>**

प्रश्न क्र. १ : फिर्यादी पक्षातर्फे झालेला साक्षीपुरावा तुम्ही ऐकला काय ?
उत्तर : होय.

प्रश्न क्र. २ : श्री. ए. बी. बाबर (फि.सा.१) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, दिनांक ०३/०८/२०१६ रोजी सकाळी ६.०० वाजता तुम्ही उच्च श्रेणी प्रतिक्षालयामध्ये अनाधिकृतपणे बसलेले असतांना मिळून आलात. याबाबत तुम्हांस काय सांगायचे आहे?

उत्तर : हे खोटे आहे.

प्रश्न क्र. ३ : सदर साक्षीदार तुमचे विरूध्द का साक्ष देतात?
उत्तर : मला माहित नाही.

प्रश्न क्र. ४ : तुम्हास स्वत:ला शपथेवर साक्ष द्यावयाची आहे का ?
उत्तर : नाही.

प्रश्न क्र. ५ : तुम्हास तुमचे बचावाकरीता साक्षीपुरावा दयावयाचा आहे काय ?
उत्तर : नाही.

प्रश्न क्र. ६ : सदर खटल्याबाबत तुम्हांस आणखी काही सांगावयाचे आहे काय?
उत्तर : नाही.

**समक्ष,**

आरोपीची सही ........................................

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक : ०३/०८/२०१६.**

**<u>प्रमाणपत्र</u>**

वरील तपासणी माझेसमक्ष ऐकणेत व घेणेत आली असून आरोपीने दिलेला जबाब पूर्णपणे व सत्यतेने नोंदला गेलेला आहे.

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक : ०३/०८/२०१६**

## — मौखिक न्यायनिर्णय —

( पारित दिनांक ०३ ऑगस्ट, २०१६. )

१) आरोपीवर कलम १५५ रेल्वे अधिनियम १९८९ अन्वये आरोप ठेवणेत आलेला आहे.

२) फिर्यादी पक्षाची संक्षिप्त हकिकत येणेप्रमाणे —

दिनांक ०३/०८/२०१६ रोजी आरोपी हा सकाळी ६.०० वाजता उच्च श्रेणी प्रतिक्षालयामध्ये अनाधिकृतरीत्या बसलेला फिर्यादी श्री. शंभूकुमार, आर.पी.एफ. कुर्डुवाडी यांना मिळून आला.

३) अपराधाचे विवरण (नि.क्र.२) आरोपीस वाचून दाखविले असता त्याने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व न्याय चौकशी करण्याची मागणी केली.

४) माझे समक्ष खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले व त्यावर मी पुढीलप्रमाणे कारणामिमांसहित निष्कर्ष देत आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक ०३/०८/२०१६ रोजी सकाळी ६.०० वाजता आरोपी हा उच्च श्रेणी प्रतिक्षालयामध्ये बसलेला असतांना मिळून आल्याचे फिर्यादी पक्षाने सिध्द केले आहे का ? | ... होय. |
| २. | आदेश काय ? | . .अंतिम आदेशाप्रमाणे. |

## ***का र ण मि मां सा***

५) **मुद्दा क्रमांक १:—**

श्री. ए. बी. बाबर (फि.सा.१) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, दिनांक ०३/०८/२०१६ रोजी सकाळी ६.०० वाजता उच्च श्रेणी प्रतिक्षालयामध्ये बसलेला असतांना फिर्यादी श्री. शंभूकुमार यांना मिळून आला व त्यांनी फिर्यादीची लेखी फिर्याद निशाणी ३ नोंदवून घेतली. तसेच सदर साक्षीदाराने साक्षीमध्ये पुढे असे सांगितले की, त्यांच्या चौकशीमध्ये आरोपी हा उच्च श्रेणी प्रतिक्षालयामध्ये बसलेला असतांना मिळून आल्याचे निष्पन्न झाले म्हणून त्यांनी आरोपीविरुद्ध प्रस्तुतची फिर्याद दाखल केली. सदरची बाब आरोपीने नाकारली आहे. परंतु तो महिला प्रतिक्षालयामध्ये बसलेला होता ही बाब त्याने नाकारलेली नाही. फक्त उलटतपासामध्ये साक्षीदाराची साक्ष नाकारणे यावरुन त्याने उच्च श्रेणी प्रतिक्षालयामध्ये बसला नसल्याचे गृहीत धरता येणार नाही. तसेच चौकशी अधिकाऱ्यास

आरोपीस खोटया प्रकरणात गुंतविणेचे कोणतेही कारण अभिलेखावर नाही. यावरुन चौकशी अधिकाऱ्याची साक्ष विश्वास निर्माण करते. सबब मी या निष्कर्षाप्रत पोहोचतो की, आरोपीने उच्च श्रेणी बोगीमध्ये बसून प्रवास केला म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे. शिक्षेबाबत आरोपीला काय सांगायचे आहे यासाठी मी माझा न्यायनिर्णय काही काळासाठी थांबवतो.

**कुर्डुवाडी येथील दौरा.**
**दिनांकः ०३/०८/२०१६.**

**( ओ. शि. पाटील )**
**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

६) **मुद्दा क्रमांक २:—**

आरोपीस शिक्षेबाबत विचारले असता त्याने प्रार्थना केली आहे की, तो गरीब असून हा त्याचा पहिलाच गुन्हा आहे. त्याचेवर पूर्ण कुटुंबाची जबाबदारी आहे. तसेच तो कुटुंबातील एकटाच कमावता पुरुष आहे. सदरील आरोपीने पूर्वी कोणताही गुन्हा केल्याचे फिर्यादी पक्षाने सिद्ध केलेले नाही. सदरील केसमधील कागदपत्र त्या_पूर्वी गुन्हा केलेला आहे असे सिद्ध करीत नाही. गुन्हयाचे स्वरुप किरकोळ आहे त्यामुळे प्रस्तुतचा गुन्हा आणि आरोपीच्या कौटुंबिक परिस्थितीचा विचार करता माझ्या मते आरोपीस दया दाखविणे योग्य वाटते. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

आरोपीस, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(२) अन्वये, कलम १५५ रेल्वे अधिनियम १९८९ या अपराधाखाली सिद्ध दोषी ठरविण्यात येत असून त्याने सदर अपराधासाठी रुपये १००/— (एकूण शंभर रुपये फक्त) दंड भरावा. दंड भरणेस कसूर केलेस चार दिवसांची साध्या कैदेची शिक्षा भोगावी.

**कुर्डुवाडी येथील दौरा**
**दिनांकः ०३/०८/२०१६.**

**( ओ. शि. पाटील )**
**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

” I affirm that the contents of this PDF file Judgment are same word for word as per original Judgment.

| | |
|---|---|
| Name of Steno | : S. K. Torane, |
| Court's Name | : O. S. Patil, J.M.F.C.Railway Court, Daund. |
| Date | : 03.**08**.2016 |
| Judgment signed by presiding officer on | : 03.**08**.2016 |
| Judgment uploaded on | : 31.**08**.2016 |